The Latur Urban Co-op. Bank Ltd.
Br. Khadkeshwar, Aurangabad
Franking Clerk

LATUR URBAN CO-OP BANK LTD., KHADKESHWAR AT AURANGABAD

D-5/STP(V)/C.R.1036/05/09/1339-42/09

31-मराठी-2 (1)

भारत 56748 SPECIAL ADHESIVE महाराष्ट्र
180255 OCT 12 2015
zero zero zero one six zero zero 13:16
Rs.0001600/- PB6854
सत्यमेव जयते
INDIA STAMP DUTY MAHARASHTRA

## AGREEMENT

An agreement in respect of Execution of tender work as per Sec. 73 read with Schedule-1 of Chapter-V of Mumbai provincial Municipal Corporation, Act 1949)

This deed agreement made on this________day of________ bet ween Aurangabad Municipal Corporation, Aurangabad through its Executive Engineer, Municipal Corporation, Aurangabad.

(Here in after called as the party of the 'First part')

And the

Contractor Shri. M/s Sterling Elect Works. R/o Aurangabad.

(Here in after called as the party of the 'Second part')

Where as the Aurangabad Municipal Corporation, has under taken the work of the Providing comprehensive M&R of the lights in Ward. A-1 W.No. 1,3,4,5,11,22,23 Cost of Rs... 24,89,551/- at aurangabad.

And where as the contractor accpted the rates of above said work fixed by the standing committee of Municipal Corporation Abad by its resolution No. and date

And where as the above said contractor is reaby to abide by terms and conditions of the contract of the tendered work which are fixed here with.

And where as the specification terms and conditions of the tendered work have been fully studied and understood by the contractor it has been agreed that the contractor shall execute the tendered work has per contract under inspection and supervision of Executive/Dy.Engineer( Light ) or any person deputed by Aurangabad Municipal Corporation by using best quality of material approved by Executive/Dy.Engineer( Light ) with in the stipuleted period of completion of work.

He is also abide by decision taken from time to time by Executive/Dy.Engineer( Light ) in respect of tendered work.

Further it has been agreed that indefualt of fulfilling terms and conditions of this agreement and completion of tendered works, Corporation has every right to forfiet the deposite amount of work, Security deposite also free to take necessary steps of recovery of losses occured there by as per conditions of contract and those given in the tendered of the work.

Municipal Corporation Aurangabad
Through its Executive Engineer
The party of the 'First part'

And the

Shri. M/s Sterling Elect works

स्थायी समिती सदस्य
महानगरपालिका औरंगाबाद

Contractor
The party of the 'Second part'

स्थायी समिती सदस्य
महानगरपालिका औरंगाबाद

(1)

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

फोन:(240)2333536-40,2348001-05,2331281,2331315
फॅक्स:(0240)-2331213.

जा.क्रं./मनपा/विद्युत-1/ 257 /2015 दिनांक:- 12 / 10 / 2015

## कार्यादेश

**प्रति,**

**मे. स्टर्लीग इलेक्ट्रीकल्स् वर्क्स,**
**गुत्तेदार,**
**औरंगाबाद.**

**विषय:- प्रभाग- अ (भाग-1 ) वार्ड क्र. 1, 3, 4, 5, 11, 22, 23 मधिल पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने देखभागल दुरुस्ती करणे.**

**संदर्भ :- आपली निविदा दिनांक 14-09-2015 निविदा रक्कम रु. 24,89,551 /-**

वरील विषीय आपणांस कळविण्यांत येते की, आपली विषयांकीत कामाची निविदा **अंदाजपत्रकीय दराने स्विकृत करण्यांत आलेली आहे.** सदरील कामाचे कार्यादेश आपणांस खालील अटी / शर्थीच्या अधीन राहुन देण्यांत येत आहे. कामाचा कालावधी नऊ महिने राहील.

**अटी व शर्ती**

1. शासनाचे पत्र क्र. जी.ई.एन.1098/1357/प्र.क्र./166-98 नवि-24 मुंबई दिनांक 01-02-1099 च्या पत्रानुसार व शासनाने तद्नंतर वेळोवेळी कळविल्यानुसार कंत्राटी कामाचा व कंत्राटी कामे पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यांत येणा-या कामगारांचा विमा शासकीय विमा निधी किंवा शासकीय विमा निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे प्रत्यक्षात काम सुरु करण्यापुर्वी करणे आवश्यक आहे.
2. ठेकेदारास पथदिवे दुरुस्तीच्या कामासाठी आवश्यक असलेली साधन सामग्री अवजारे, शिडी (Alluminium Adjustable ladder uptp 12 mtr height ) तसेच मनुष्यबळ ( योग्यता प्राप्त तांत्रिक कर्मचारी ) अद्यावत ठेवणे बंधनकारक राहील.तसेच विविध परवान्यांचे नियमानुसार नुतनीकरणे करुन अद्यावत ठेवणे.

3. आपल्या या कामाकरीता कार्यरत असणा-या कर्मचा-यांची शैक्षणिक / तांत्रिक अर्हताच्या पुराव्यासह यादी सादर करावी. तसेच गुत्तेदाराने त्यांचे कर्मचा-यांना ओळखपत्र देणे आवश्यक आहे.

4. कोणत्याही पोलवर, पॅनलबोर्डमध्ये जंक्शन बॉक्स, सर्व्हीस वायर, केबल, विद्युत संच मांडणी इत्यादी ठिकाणी विद्युत प्रवाह येऊन गुत्तेदार यांचे कर्मचारी तसेच अन्य बाह्य व्यक्ती / प्राण्यास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ( जिवित व वित्तहानीस ) कंत्राटदारावर राहील.

5. देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी निविदा पुस्तकात नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहुन काम करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

6. सदरील कामाकरीता निविदा पुस्तकातील अटी व शर्तीमध्ये नमुद केलेल्या मान्यता प्राप्त कंपन्यांचे विद्युत साहित्य वापरणे बंधनकारक राहील. सार्वजनिक बांधकाम ( विद्युत विभाग ) यांच्याकडील मान्यताप्राप्त कंपनीचे.

7. उक्त पथदिव्यांच्या कामांतर्गत विज पुरवठा मिटर जळालेले अथवा नादुरुस्त असल्यास त्याची संबंधीत कार्यालयाकडुन दुरुस्ती किंवा बदलण्याची कार्यवाही कंत्राटदारास करावी लागेल.

8. पथदिवे दुरुस्तीचे काम करतांना विज वितरण कंपनीच्या संबंधित कार्यालयाशी संपर्क साधुन संबंधित भागाचा / संबंधित लाईन सर्कीटचा विज पुरवठा बंद झाल्याची खात्री झाल्यानंतरच पथदिवे दुरुस्तीचे काम करणे व काम झाल्यानंतर संबंधीत कार्यालयास अवगत करणे तसेच याची लेखी नोंद ठेवणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. याबाबतची सर्व जबाबदारी (अपघात वै.) कंत्राटदाराची राहील.

9. पथदिव्याच्या कामाकरीता खोंदकाम करण्यापुर्वी आवश्यक इतर सर्व विभागाची परवानगी घेणे विद्युत ठेकेदारास बंधनकारक राहिल. या करीता महानगरपालिकेकडुन कुठलाही आर्थिक खर्च करण्यांत येणार नाही.

10. गुत्तेदारास शहरातील पथदिवे चालु-बंद करणे हे विद्युत विभागाकडुन दरमहा मिळणा-या वेळापत्रकाप्रमाणे चालु बंद करणे बंधनकारक राहील. पथदिवे वेळापत्रका प्रमाणे चालु बंद न झाल्यास वाढीव येणारे युनीट एमएसईडिसीईएल कंपनीच्या दरानुसार चार्ज करुन गुत्तेदाराकडुन वसुल करण्यांत येईल.

11. शहरातील पथदिवे चालु बंद करतांना एखाद्या प्रभागातील दिवे तांत्रिक कारणाने बंद आढळल्यास तसेच विद्युत विभागाकडे लेखी कळविण्यांत यावे. व एमएसईडीसीईएल कंपनीच्या मदतीने विनाविलंब तात्काळ चालु करुन घ्यावे.

12. गुत्तेदाराने दररोज कार्यालयात सकाळी 10.00 वाजता दैनंदिन कामाचा अहवालाच्या सोबत उपस्थित रहाणे आवश्यक आहे. व प्राप्त तक्रांरी नोंद घेणे.

13. नेमुन दिलेल्या भागापैकी एखाद्या किंवा एकापेक्षा जास्त भाग चालु न केल्यास व इतर बंद बाबत तक्रार प्राप्त झाल्यास नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यांत यईल. 95% पथदिवे नियमितपणे चालु असणे बंधनकारक अहे.

14. नेमुद दिलेल्या भागातील बंद पथदिवे तिन दिवसांच्या आंत दुरुस्त न झाल्यास ठेकेदारास प्रति दिवस प्रति पोल रु. 100/- प्रमाणे दररोज दंड आकारण्यांत येईल.

15. गुत्तेदारास त्याचे स्वत:चे ऑपरेटर, दुरध्वनी सुविधा इतर आवश्यक असणा-या सर्व सुविधांनी युक्त असे संपर्क कार्यालय स्थापन करणे आवश्यक आहे.

16. कामाचा आदेश मिळतांच 15 दिवसांच्या आंत ठेकेदाराने स्वखर्चाने त्यांना देण्यांत आलेल्या नमुन्यात सर्व पथदिव्यांचे सर्वेक्षण करुन त्यानुसार पोल क्रमांक टाकुन अहवाल विहीत नमुन्यात

कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.सदर माहिती दिल्याशिवाय देयक देण्यांत येणार नाही. याची नोंद घ्यावी.

17. आपले कार्यक्षेत्रात स. नगरसेवक किंवा नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यावर 72 तासांच्या आंत दुरुस्तीचे कार्यवाही न झाल्यास हे दुरुस्तीचे काम उपलब्ध ठेकेदाराकडुन Risk and Cost Basis वर करुन घेण्यांत येईल. या कामापोटी येणारा खर्च दंडासह आपल्या चालु देयकामधुन वसुल करण्यांत येईल. प्रकरणी आपली कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
18. आपल्या कार्यक्षेत्रात कामाबाबत वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यास, उपलब्ध गुंत्तेदारामार्फत काम करुन घेण्यांत येईल. उपरोक्त अट क्र 17 प्रमाणे दोन वेळेस Risk and Cost Basis वर काम करावे लागल्यास, सक्षम मान्यतेनुसार सदरचे काम आपल्याकडुन काढुन घेण्यांत येऊन, आपले नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यांत येईल.
19. एखाद्या लाईनची केबल खराब झाल्यास व फॉल्टमूळे लाईट बंद राहिल्यास त्याठिकाणी संबंधीत कॅाम्प्रेहेन्सीव्ह ठेकेदाराने सर्व्हीस वायर टाकुन त्वरीत लाईन चालु करणे तसेच फॉल्ट दुरुस्तीनंतर या ठिकाणी नविन केबल टाकण्याचे काम परिशिष्ट - ब मध्ये दर्शविण्यांत आल्यानुसार करण्यांत यावे.
20. आपले कर्मचारी दररोज कार्यालयात येतील व कार्यालयाच्या निर्देशानुसार दैनंदिन अहवाल घेऊन काम करणे बंधनकारक आहे.
21. एखाद्या वृत्तपत्रात दिवसा पथदिवे चालु आहेत असे छापुन आल्यास त्याची शहनिशा करुन सदरच्या बाबीसाठी दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित केली जाईल.
22. आपत्कालीन परिस्थितीत देखभाल दुरुस्ती करता यावी यासाठी ठेकेदाराने खालील प्रमाणे साहित्य कार्यालयात जमा करावे.
    24 वॅट रॉड 50 नग , चोक -50
    70, 150, 250, HPSV LAMP व त्यासाठी लागणारे चोक ( प्रत्येकी -25 )
    सर्व्हीस वायर कॅाईल.
23. देखभाल दुरुस्ती अंतर्गत Replace केलेले जुने / साहित्य प्रत्येक आठवड्यात कर्यालयात जमा करावे लागेल.

**कार्यकारी अभियंता,**
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रतिलिपी :-**

1. श्री. जोशी आर. सी. (शाखा / कनिष्ठ अभियंता) यांना उक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव.